30 OCT 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील कॅम्पस ड्राइव्हअंतर्गत विविध कंपन्यांत बारा विद्यार्थ्यांची निवड झाली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागातील मार्गदर्शक आणि कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या बारा विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन लाखांचे पॅकेज

## कॅम्पस ड्राइव्हअंतर्गत निवड : अंतिम वर्षातच रोजगाराची संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाद्वारे आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांच्या अंतिम वर्षातील बारा विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. त्यांना प्रत्येकी प्रतिवर्ष तीन लाखांचे पॅकेज मिळणार आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रश्मी वादगवे, सृष्टी करोषी, अंकिता आमटे, शिविका ओझा, बाळकृष्ण लिमये, विजय पाटील, श्रेयस देसाई, अर्पिता घोरपडे, अबोली जाधव, यश कोशामकर, राकेश सुतार, असीम शेख यांचा समावेश आहे.

आयटी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील एक्स्ट्राप्रिन्युअर इंडिया आणि थिंकलाऊड सोल्युशन या कंपन्या कॅम्पस ड्राईव्हसाठी आल्या होत्या. कंपनीचे संचालक अविनाश भोकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया, पॅकेज, आदींबाबत मार्गदर्शन केले. ॲप्टिट्यूड टेस्ट व वैयक्तिक मुलाखतींमधून अंतिम बारा विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रतिवर्ष तीन लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. एस.बी. सादळे यांनी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### ड्राईव्हमध्ये १११ विद्यार्थी सहभागी

- अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात कॉम्प्युटर व इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह घेण्यात आला.
- ड्राईव्हमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि डॉ. डी. वाय पाटील इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी महाविद्यालयातून १११ विद्यार्थी सहभागी झाले.

लोकमत

# विद्यापीठाच्या परीक्षांचे अर्ज दिवाळीनंतर भरा

## ऑनलाइन प्रक्रिया १२ नोव्हेंबरपासून सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून हिवाळी सत्रात (ऑक्टोबर - नोव्हेंबर) घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया दि. १२ नोव्हेंबरपासून होणार आहे. अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. ७ डिसेंबरपर्यंत आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, सर्व पदविका, प्रमाणपत्र, बी-व्होक आदी विविध ६६४ परीक्षा विद्यापीठाकडून या हिवाळी सत्रामध्ये घेण्यात येणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने यावर्षी परीक्षा शुल्कामध्ये वाढ केलेली नाही. परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने भरायचे आहेत. विनाविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. १२ ते २६ नोव्हेंबर, विलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. २ डिसेंबर, तर अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. ७ डिसेंबरपर्यंत आहे. जे विद्यार्थी ५० टक्के अथवा



त्यापेक्षा कमी विषय अनुत्तीर्ण असतील अशा विद्यार्थ्यांकडून एकूण परीक्षा शुल्काच्या ५० टक्के परीक्षा शुल्क आकारण्यात येणार आहे. जे विद्यार्थी ५० टक्क्यांपेक्षा जास्त विषयात अनुत्तीर्ण असतील त्यांच्याकडून संपूर्ण शुल्क आकारण्यात येणार आहे. त्याबाबतच्या सूचना विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी शुक्रवारी दिली.

30 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान विभागातील १२ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांत निवड

टेंबलाईवाडी, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाद्वारे आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांच्या अंतिम वर्षातील बारा विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली. त्यांना प्रत्येकी वार्षिक ३ लाख रुपयांचे पॅकेज मिळणार आहे.



अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात कॉम्प्युटर व इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित केला.



**शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील कॅम्पस ड्राइव्हअंतर्गत विविध कंपन्यांत निवड झालेले विद्यार्थी विभागातील मार्गदर्शक व कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसमवेत.**

आयटी व सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट क्षेत्रातील नामवंत एक्स्ट्राप्रिन्युअर इंडिया आणि थिंकलाऊड सोल्युशन कंपन्या कॅम्पस ड्राईव्हसाठी आल्या होत्या. कंपनीचे संचालक अविनाश भोकरे व सहकारी यांनी विद्यार्थ्यांना कंपनीविषयी माहिती, मुलाखतीची प्रक्रिया व पॅकेजबाबत मार्गदर्शन केले.

ड्राईव्हमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि डॉ. डी. वाय पाटील इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी महाविद्यालयातून १११ विद्यार्थी सहभागी झाले. ॲप्टिट्यूड टेस्ट व वैयक्तिक मुलाखतींमधून अंतिम १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यशस्वी विद्यार्थ्यांत रश्मी वादगवे, सृष्टी करोषी, अंकिता आमटे, शिविका ओझा, बाळकृष्ण लिमये, विजय पाटील, श्रेयस देसाई, अर्पिता घोरपडे, अबोली जाधव, यश कोशामकर, राकेश सुतार, असीम शेख यांचा समावेश आहे. अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन केले. प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी आयोजन केले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे मार्गदर्शन आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ

# परीक्षा शुल्क वाढीस वर्षासाठी स्थगिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा शुल्क वाढीस एक वर्षासाठी (२०२१-२२) स्थगिती देण्यात येत आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार कोरोनामुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थी शुल्क भरू शकत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या निर्णयाची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# 'तंत्रज्ञान'च्या १२ विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाद्वारे आयोजित कॅम्पस ड्राईव्हमध्ये संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स कम्युनिकेशन या अभियांत्रिकी शाखांच्या अंतिम वर्षातील बारा विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

यावेळी एक्स्ट्राप्रिन्यूअर इंडिया आणि थिंकलाऊड सोल्युशन यांचे प्रतिनिधी आले होते. तंत्रज्ञान अधिविभाग आणि डॉ. डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी महाविद्यालयातून १११ विद्यार्थी सहभागी झाले होते. यातील रश्मी वादगवे, सृष्टी करोषी, अंकिता आमटे, शिविका ओझा, बाळकृष्ण लिमये, विजय पाटील, श्रेयस देसाई, अर्पिता घोरपडे, अबोली जाधव, यश कोशामकर, राकेश सुतार आणि असीम शेख या १२ जणांची निवड झाली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तंत्रज्ञानचे संचालक डॉ. आर. के. कामत, कंपनीचे संचालक अविनाश भोकरे यांनी मार्गदर्शन केले. प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. एस. बी. सादळे यांनी उपक्रमाचे आयोजन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा अर्ज प्रक्रियेस १२ नोव्हेंबरपासून प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ च्या हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज स्वीकारणे व परीक्षा शुल्काबाबतच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालये, अधिविभागात १२ ते २६ नोव्हेंबर या कालावधीत विनाविलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे.

विद्यापीठ परीक्षा विभागाने परीक्षा अर्ज स्वीकारणे, परीक्षा शुल्काबाबतचे परिपत्रक काढले आहे. त्यानुसार २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत विलंब शुल्क व त्यानंतर ४ ते ७ डिसेंबरपर्यंत अतिविलंब शुल्काने विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे २९ नोव्हेंबरपासून ९ डिसेंबरपर्यंत परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करावयाच्या आहेत. परीक्षांच्या तारखा लवकरच जाहीर केली जाईल.

पुढारी

# विद्यापीठात आज ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील गांधी अभ्यास केंद्र संयोजित डॉ. उषा मेहता व्याख्यानमालेअंतर्गत 'देशभक्त केशवराव जेधे : कार्यकर्तृत्व' या विषयावर शनिवार, दि. ३० रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन व्याख्यान होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. अरुण भोसले असणार आहेत.